**पोलीस उप-आयुक्त,गुन्हे पिंपरी चिंचवड**
पोलीस आयुक्त कार्यालय,पिंपरी चिंचवड,प्रेमलोक पार्क,चिंचवड,पुणे - ३३
**दुरध्वनी क्र.** ०२०-२७३५०१२० ई मेल आयडी – dcphq.pcpc-mh@gov.in

# प्रेसनोट

## भोसरीत भंगार विक्रीतुन मिळालेल्या पैश्यांच्या वाटणीच्या वादातुन मित्राचा खुन करणा-या दोन इसमांना गुन्हे शाखा युनिट १ कडून अटक.

दिनांक १२/०६/२०२३ रोजी अनोळखी इसमांचा अज्ञात कारणा अज्ञात इसमाने खुन केल्याबाबत एम.आय.डी.सी भोसरी पोलीस ठाणे, गु.रजि.नं. २५१/२०२३ भादवि कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासा दरम्यान मयत अनोळखी इसम हा रविंद्र सिंह, रा.कुदळवाडी, चिखली, पुणे हा असल्याचे निष्पन्न झाले होते.

सदरचा गुन्हा घडल्यापासुन गुन्हे शाखा, युनिट १ कडील २ टिम्स समांतर तपास करुन सर्व भंगार दुकाने दारु दुकाने व इतर ठिकाणी आरोपींचा शोध घेत होते, सदर तपास करत असताना **पो.शि.१७९१ गर्जे** यांना गोपनीय खात्रीशीर माहिती मिळाली की, दाखल गुन्हयातील मयत नामे रविंद्र सिंह याचा खुन करणारे संशयीत इसम हे त्याचे सोबत राहणारे मित्र असुन ते विसावा चौक कुदळवाडी, चिखली, पुणे परिसरातील आहेत. त्यानुसार त्या ठिकाणी पाळत ठेवण्यात आली होती. त्यानंतर मिळालेल्या अधिकच्या माहीतीवरुन हॉटेल जायका चहा कुदळवाडी परिसरात कसोशीने आरोपीचा शोध घेत असताना चौधरी वजन काटयाकडे जाणारे रोडचे डावे बाजुस आडोश्यास दोन संशयित इसम बसलेले दिसले. आम्ही व स्टाफ हे त्याचेकडे जात असताना ते पोलीस आल्याच्या भितीने पळुन जावु लागले. त्याचा पाठलाग करुन त्यांना थोडयाच अंतरावर पकडून ताब्यात घेतले. त्यांना नाव पत्ता विचारता त्यांनी त्याचे नाव व पत्ता **१) जितेंद्रकुमार सुभाष भारव्दाज, वय - २८ वर्षे, रा.फिरस्ता मुळ गांव- खरदाहा निलकंठ, ता.सलेमपुर,जि.देवरीया, राज्य उत्तरप्रदेश, २) रवि सुखलाल गिंधे, वय - २७ वर्षे, रा. फिरस्ता, मुळ गांव- यलदरी कॅम्प, ता.जिंतुर, जि.परभणी** असे असल्याचे सांगितले. सुरवातीस त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली असता अधिक सखोल चौकशी करता त्यांनी मयत इसम रविंद्र सिंह हा त्याचा मित्र असुन भंगार विक्रीतुन मिळालेल्या पैश्याच्या वाटणीच्या वादातुन त्यांनी व इसम नामे टिक्या पुर्ण नाव माहित नाही असे तिघांनी मिळुन खुन केल्याची कबुली दिली आहे.

नमुद निष्पन्न आरोपी **१) जितेंद्रकुमार सुभाष भारव्दाज, वय - २८ वर्षे, रा.फिरस्ता मुळ गांव- खरदाहा निलकंठ, ता.सलेमपुर,जि.देवरीया, राज्य उत्तरप्रदेश, २) रवि सुखलाल गिंधे, वय - २७ वर्षे, रा. फिरस्ता, मुळ गांव- यलदरी कॅम्प, ता.जिंतुर, जि.परभणी** यांना एम.आय.डी.सी भोसरी पोलीस ठाणे, गु.रजि.नं. २५१/२०२३ भादवि कलम ३०२ या गुन्ह्याचे

कामी एम.आय.डी.सी भोसरी पोलीस स्टेशनला हजर केले आहे.

सदरची कारवाई पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, सह पोलीस आयुक्त संजय शिंदे, अप्पर पोलीस आयुक्त वसंत परदेशी, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) स्वप्ना गोरे, सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) सतिश माने यांचे मार्गदर्शनाखाली वरीष्ठ पोलीस निरीक्षक संतोष पाटील, पोलीस उप निरीक्षक शेख पोलीस अमंलदार बाळु कोकाटे, मनोजकुमार कमले, सोमनाथ बोहाडे, महादेव जावळे, फारुक मुल्ला, अमित खानविलकर, गणेश महाडीक, सचिन मोरे, उमाकांत सरवदे, प्रमोद हिरळकर, प्रमोद गर्जे, अजित रुपनवर, विशाल भोईर, मारोती जायभाये, स्वप्निल महाले, तानाजी पानसरे यांनी केली आहे.

(स्वप्ना गोरे)
पोलीस उप आयुक्त (गुन्हे शाखा)
पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय,पुणे